**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**श्रीचा चांदीचा पलंग व इतर चांदीकामाची दुरूस्ती करणेबाबत.**

श्रीचा चांदीचा पलंग व इतर चांदी कामाची दुरूस्ती करणेबाबत पाहणी करून, दुरूस्तीची दरपत्रके दि.१५/१२/२०१७ पर्यंत मागविण्यात येत आहेत. त्याबाबतच्या अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या संकेत स्थळावर व तुकाराम भवन, पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.नित्योपचार विभाग/का.वि./ /२०१७ दि.०५/१२/२०१७

स्वा/-

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र.: ०२१८६-२२४४६६)

**श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**अटी व शर्ती (जाहिरात दि.०६/१२/२०१७).**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. याबाबतची माहिती, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संत तुकाराम भवन, नित्योपचार विभाग येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. श्री. विठ्ठलाचा चांदीचा पलंग दुरूस्ती करणे किंवा नवीन तयार करणे. तसेच श्री. विठ्ठल गाभारा व श्री. रूक्मिणी गाभारा चांदीकामाची पाहणी करून त्याबाबतचे आपले दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१५/१२/२०१७ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

३. आपण सदर कामाबाबत सादर केलेल्या दरपत्रकामध्ये / अर्जांमध्ये सदर कामाची मजुरी, साहित्य खरेदी खर्च, चांदीचा तपशिल / खर्च व इतर खर्च इत्यादीचा सविस्तर तपशिल नमुद करावा.

४. सदर दुरूस्तीच्या कामामध्ये पूर्वीच्या नक्षीकामामध्ये व मुर्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

५. सदर कामाची पाहणी करून त्याबाबत दुरूस्ती करणेकामी सविस्तर माहिती मंदिर समितीस दिल्यानंतर आपणास दुरूस्तीचे काम देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

६. सदर कामाबाबत परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती व अनुभव प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७. आपल्या अर्जामध्ये आपले मानधन नमुद करावे किंवा श्री. विठ्ठल रूक्मिणीची सेवा म्हणून मोफत काम करून द्यावे. अनुभवी तंज्ञांना प्राधान्य देण्यात येईल.

८. सदरचे काम करताना आपल्याकडून काही चुक झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

९. सदरचे काम करताना या कार्यालयातील अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना आपल्यावर बंधनकारक राहतील.

१०. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपल्यावर बंधनकारक राहील.

११. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१२. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१३. ज्यांना सदरचे काम देण्यात येईल, त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidavit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.